## <u>ठळक बातम्या</u>

- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ
- नवीन प्राप्तिकर विधेयक लोकसभेत मंजूर
- परदेशी संस्थांत्मक गुंतवणुकदारांच्या खरेदीच्या जोरावर शेअर बाजारात तेजी
- पुणे जिल्ह्यात वाहन दरीत कोसळून झालेल्या अपघातात ८ महिलांचा मृत्यू, २९ जण जखमी, केंद्र आणि राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर

**आणि**

- १८वी खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड आजपासून मुंबईत सुरू

<><><><><>

राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तसंच निवृत्ती वेतन धारकांना आता ५३ ऐवजी ५५ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जानेवारीपासून या महागाई भत्त्याची थकबाकीही ऑगस्टच्या वेतनासोबत दिली जाईल. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं आज जारी केला.

<><><><><>

शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षित वाहतूकीचा पर्याय उपलब्ध व्हावा यासाठी स्कूलबस परवाना वाटप खुलं केल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. याबाबतची अधिसूचना लवकरच जारी होईल, असं सरनाईक म्हणाले. केंद्र सरकारनं स्कूलबस नियमावली तयार केली आहे. यानुसार १२ अधिक १ आसनव्यवस्था असलेल्या चारचाकीला स्कूलबसचा दर्जा दिला जाणार

आहे. यात जीपीएस, अग्निशमन अलार्म यंत्रणा, सीसीटीव्ही आणि डॅशबोर्डवर स्क्रीन, वाहन ट्रॅकिंग, पॅनिक बटण, आपत्कालीन दरवाजे अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा समावेश केला आहे, असं सरनाईक यांनी सांगितलं.

<><><><><>

'सण महाराष्ट्राचा- संकल्प अन्न सुरक्षेचा' या राज्यव्यापी मोहिमेचा प्रारंभ आज नाशिकमध्ये अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते करण्यात आला. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर मिठाई विक्रेते, हॉटेल्स, आणि तत्सम व्यवसायिकांकडून खाद्य पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या तेल, दूध, तूप आदी पदार्थांचे नमुने तपासणीसाठी घ्यावेत, आणि तपासणीत त्रुटी आढळून आली तर संबंधित व्यवसायिकावर कारवाई करावी, अशा सूचना मंत्री झिरवाळ यानी यावेळी दिल्या.

<><><><><>

लोकसभेत आज  कर आकारणी कायदे सुधारणा विधेयक, २०२५ आणि नव्यानं मांडलेलं प्राप्तिकर विधेयक, २०२५ ही दोन विधेयकं आवाजी मतानं मंजूर झाली. विविध कारणांवरून विरोधकांचा गदारोळ सुरु असताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही विधेयकं सभागृहात मांडली.  नव्यानं मांडलेलं प्राप्तिकर विधेयक हे सहा दशकं जुन्या प्राप्तिकर कायदा, १९६१ ची जागा घेईल. भाजपा खासदार बैजयंत पांडा यांच्या अध्यक्षतेखालच्या संसदीय प्रवर समितीनं सुचवलेल्या २८५ शिफारसींचा यात अंतर्भाव केला आहे. याआधीच्या प्राप्तिकर विधेयकात काही त्रुटी आढळल्यानं सरकारनं ते गेल्या आठवड्यात मागे घेतलं होतं. सुधारित विधेयकात क्लिष्ट भाषा हटवून सुलभ कर भाषेत प्राप्तिकर सवलतींचं विवरण देण्यात आलं आहे. प्रमाणित वजावट, घराच्या मालमत्तेतून मिळणारं उत्पन्न इत्यादीबाबतचा संभ्रम सोप्या , सरळ भाषेत दूर  करण्यात आल्याचं सीतारामन यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज जोरदार तेजी अनुभवली. दिवसअखेर सेन्सेक्स ७४६ अंकांनी वधारून ८० हजार ६०४ अंकांवर तर निफ्टी २२२ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ५८५ अंकांवर स्थिरावला. परदेशी संस्थांत्मक गुंतवणूकदार तसंच म्युच्युअल फंडातून होत असलेल्या खरेदीनं बाजारात तेजी दिसून आली.

**<><><><><>**

मुंबईतल्या कबुतरखान्यात कबुतरांना खायला घालू नये या मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करायला नकार देत कबुतरांना खायला घालणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला आज दिले. याचिकाकर्त्यांनी आदेशात बदल करण्याची विनंती उच्च न्यायालयात करावी असंही न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि विजय बिष्णोई यांच्या पीठाने म्हटलं आहे.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यात पोईट इथं आज कुंडेश्वराच्या दर्शनाला चाललेल्या महिला भाविकांचं वाहन दरीत कोसळून ८ जणींचा जागीच मृत्यू झाला, तर २९ जण जखमी झाले. स्थानिकांच्या मदतीनं पोलिसांनी जखमींना चांडोली ग्रामीण रुग्णालय आणि खासगी रुग्णालयात दाखल केलं आहे. अनेक जखमींची प्रकृती गंभीर असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदतही त्यांनी जाहीर केली आहे.

राज्य सरकारतर्फे मृतांच्या कुटुंबांना चार लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी जाहीर केली आहे.

जखमींना आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत आणि उपचार उपलब्ध करून देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजीत पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

**<><><><><>**

१८वी खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाड आजपासून मुंबईत सुरू झालं. या स्पर्धेचं आत्तापर्यंतचं हे सगळ्यात भव्य स्वरूप असून ६४ देशांमधून एकंदर २८८ विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत, अशी माहिती होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे संचालक प्राध्यापक अर्णब भट्टाचार्य यांनी दिली.

**होल्ड... बाइट- प्रा. अर्णब भट्टाचार्य**

१० दिवस चालणाऱ्या या स्पर्धेचा मुख्य उद्देश खगोलशास्त्रात गती असणाऱ्या जगभरातल्या विद्यार्थ्यांना एकत्र आणणं, त्यांच्यात संवाद घडवून आणणं हा आहे, असं आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र ऑलिम्पियाडचे अध्यक्ष प्राध्यापक अनिकेत सुळे यांनी सांगितलं. भारताकडून पाच विद्यार्थ्यांचा चमू या स्पर्धेत सहभागी होणार असून त्यांचं नेतृत्व हरविंदर कौर जस्सल आणि जसजीत सिंह बागला हे दोघे करणार आहेत.

**<><><><><>**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने देशभर हर घर तिरंगा अभियान राबविलं जात आहे. राज्यात यानिमित्त आयोजित कार्यक्रमांची माहिती ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड... व्हॉईस कास्ट**

*हर घर तिरंगा अभियानांतर्गत नाशिक महानगरपालिकेच्या वतीने आज विविध देशभक्तीपर उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात भव्य मानवी साखळी आणि विशाल राष्ट्रध्वज झळकवण्याचा कार्यक्रम पार पडला. हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने वाशीम शहरातल्या भटक्या समाजाच्या*

*नागरिकांनीही आपल्या पालावर आज तिरंगा फडकावला. हरघर तिरंगा अभियानाअंतर्गत हिंगोली नगर परिषदेच्या वतीनं आज तिरंगा रॅली काढण्यात आली. हिंगोली जिल्ह्यात औंढा नागनाथ इथल्या भक्त निवासात शासकीय योजनांची माहिती देणारं मल्टिमीडिया प्रदर्शन सुरू झालं आहे. हे प्रदर्शन केंद्र सरकारच्या माहिती प्रसारण मंत्रालयाच्या नांदेड येथील केंद्रीय संचार ब्यूरोच्या वतीने आयोजित करण्यात आलं आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालय आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणारा देशभक्तीपर चित्रपटांचा महोत्सव आजपासून मुंबई तसंच नवी दिल्ली इथे सुरू झाला. भारतीय चित्रपट संग्रहालयाच्या सभागृहात या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून या महोत्सवाला निःशुल्क प्रवेश देण्यात येणार आहे. येत्या १३ तारखेपर्यंत हा महोत्सव चालणार आहे.*

**<><><><><>**

महाराष्ट्र हा आजपर्यंत नेहमी देशाला दिशा दाखवत आला आहे. राज्यातल्या जनतेला जुलूमशाही विरोधात रस्त्यावर उतरावं लागेल, असं आवाहन माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. महायुती सरकारमधल्या कथित भ्रष्ट मंत्र्यांच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज मुंबईसह राज्यभरात आंदोलन केलं. त्यानिमित्त मुंबईत उद्धव ठाकरे यांनी आंदोलकांना संबोधित केलं. महायुती सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यावर त्यांनी टीकास्त्र सोडलं. भ्रष्टाचाऱ्यांना दूर करुन मंत्रिमंडळात घ्यायला दुसरे कुणी नाहीत का? फडनवीस यांनी त्यांना हा भ्रष्टाचार पटतोय का, हे सांगावं, असं ते म्हणाले. राज्य सरकारमधल्या भ्रष्टाचारी आणि वादग्रस्त मंत्र्यांचे राजीनामे घ्यावेत, अशी मागणी करत नव्या मुंबईत वाशी इथं, तसंच धुळे, हिंगोली, आणि इतरत्रही उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आंदोलन केलं.

**<><><><><>**

भारताच्या एकोणऐंशीव्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने होणारा राज्यातला मुख्य शासकीय सोहळा १५ ऑगस्ट रोजी मुंबई इथे मंत्रालयात होणार आहे. सकाळी नऊ वाजून पाच मिनिटांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. पुणे इथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. ठाणे इथे जिल्हा मुख्यालयात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते तर बीड इथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. नाशिक इथे राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते तर रायगड जिल्ह्यात राज्याच्या महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.

<><><><><>

पुढचा आठवडाभर राज्यातल्या चारही विभागांमध्ये कमी-अधिक प्रमाणात पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

येत्या दोन दिवसात, कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//